# यावल महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी

यावल (वार्ताहर)आज दि. 19/02/2021 शुक्रवार रोजी महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली महाविद्यालयाचे प्राचार्या.डॉ. एस. एम. सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी इतिहास विभागाचे प्रा. व्ही. बी. पाटील यांनी आपल्या व्याख्यानातून शिवाजी महाराजांच्या जीवन कार्याची ओळख करून दिली. यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्या उपप्राचार्य प्रा. ए. पी. पाटील यांनी अध्यक्षस्थानी कार्यक्रमाला हजर होते. त्यांनी अध्यक्षीय मनोगतात शिवजयंतीनिमित्त महाविद्यालयात उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांना तसेच सहकाऱ्यांना महाराजांच्या जीवन कार्यातील एक तरी गुण अंगी करावा असेआवाहन केले. यानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. याप्रसंगी प्रा. डी. एन. मोरे, प्रा. सी. के. पाटील, प्रमोद कदम, श्री. संजू कदम, मिलिंद बोरघडे, संतोष ठाकूर, दशरथ पाटील, बाळू पाटील, ललित भोईटे व महाविद्यालयातील माजी विद्यार्थी या कार्यक्रमाला हजर होते. आभार प्रा. डी.एम. मोरे यांनी मानले.



